Peer Reviewed Referred and UGC Listed Journal No. 47100

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# GENIUS

Volume - XI, Issue - II
February - July - 2023
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.538
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - XI Issue - II February - July - 2023

Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.538
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | १९ व्या शतकातील स्त्री सुधारणावादी चळवळीचा आढावा<br>**प्रा. कानडे शोभा भिमप्पा** | १-४ |
| २ | विधवा आणि अनाथ महिलांच्या उध्दारक पंडिता रमाबाई<br>**डॉ. मनोज कृष्णराव सरोदे** | ५-१० |
| ३ | पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्य<br>**श्री. पेटकर योगेश हिरामण** | ११-१४ |
| ४ | पंडिता रमाबाई यांचे सामाजिक चळवळीतील योगदान<br>**डॉ. रवींद्र पुंजाजी मते** | १५-१८ |
| ५ | ज्ञानोदय : धर्मांतरीतांचे वडिलार्जित हक्क आणि विधवा पुनर्विवाह<br>**डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे** | १९-२२ |
| ६ | भारतातील धर्म, संस्कृती आणि लिंग स्त्रीवादी परीपेक्षातून कारणमीमांसा<br>**प्रा. डॉ. संजय तुळशीराम शेलार** | २३-२९ |
| ७ | पंडिता रमाबाई एक स्त्री समाजसुधारक<br>**प्रा. देशमुख सुरेखा विठ्ठल** | ३०-३३ |
| ८ | पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्यातील योगदान<br>**डॉ. दीपक पांडुरंग लोणकर** | ३४-३८ |
| ९ | जहाल, क्रांतिकारी स्त्री समाजसुधारक : पंडिता रमाबाई<br>**महानवर राजेंद्र भिकू** | ३९-४२ |
| १० | १९ व्या शतकातील स्त्री विषयक सुधारणा चळवळी विषयी विचार<br>**डॉ. श्वेता सावले** | ४३-४६ |
| ११ | पंडिता रमाबाई : सर्वंकष क्रांतीचा प्रेरणास्त्रोत<br>**किशोर जनार्दन लांडेपाटील** | ४७-५२ |
| १२ | महात्मा फुलेंचे शिक्षणासंबंधीचे विचार<br>**मोहिते दिगंबर तुळशीदास** | ५३-५६ |
| १३ | पंडिता रमाबाई जीवन आणि कार्य<br>**डॉ. राखी जाधव** | ५७-६० |
| १४ | महाराष्ट्रातील स्त्री सुधारक पंडिता रमाबाई यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. जगताप बाळासाहेब भिकाजी**<br>**प्रा. टेळे रोहिणी गंगाराम** | ६१-६५ |




Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | काशीबाई कानिटकर : आद्य मराठी लेखिका<br>**प्रा. बंडू विलास उगाडे** | ६६-६७ |
| १६ | पंडिता रमाबाईंचे सामाजिक परिवर्तनातील योगदान<br>**प्रा. डॉ. चंद्रभान बाळूबा मेंगाने** | ६८-७३ |
| १७ | पंडिता रमाबाई : सामाजिक कार्याचा मागोवा<br>**प्रा. डॉ. रत्नाकर बाजीराव म्हस्के** | ७४-७७ |
| १८ | एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवन<br>**सा. प्रा. शुभांगी दामोदर बारवकर** | ७८-८० |
| १९ | सामाजिक सुधारणा चळवळीत पंडिता रमाबाई यांचे योगदान<br>**कु. अक्षदा गोरख कुंभार** | ८१-८४ |
| २० | महान सुधारक पंडिता रमाबाई<br>**सहा. प्रा. दिपक हरी लहासे** | ८५-८७ |
| २१ | पंडिता रमाबाई आणि शारदा सदन<br>**प्रा. डॉ. भूषण गोविंद फडतरे** | ८८-९२ |
| २२ | भारतात पितृप्रधान संस्कृतीला आव्हान देऊन स्त्री मुक्तीसाठी प्रथम लढा देणारी : पंडिता रमाबाई<br>**श्री. प्रकाश महादू गावित** | ९३-९७ |
| २३ | कृतीशील समाजसुधारक : पंडिता रमाबाई<br>**प्रा. रमेश अंबऋशी शितोळे** | ९८-९९ |
| २४ | १९ व्या शतकातील पंडिता रमाबाईचे कार्य<br>**कु. वैष्णवी अनिल गवळी** | १००-१०३ |
| २५ | सत्यशोधक विद्यादेवी सावित्रीबाई रोडे<br>**प्रा. श्रीमती संध्या जयसिंग माने** | १०४-१०८ |
| २६ | सामाजिक सुधारणा चळवळीत पंडिता रमाबाई यांचे कार्य व कर्तृत्व : एक अभ्यास<br>**प्रा. घोडके गजानन कोंडीबा** | १०९-११२ |
| २७ | पंडिता रमाबाई यांचे साहित्य व लिंग समानतेतील योगदान<br>**श्री. अनिल पोपट सोनवणे** | ११३-११७ |
| २८ | संत श्री शेख महंमद यांचा सर्वधर्मभाव<br>**प्रा. हरिदास शंकर जाधव** | ११८-१२१ |




Scanned with CamScanner

# २३. कृतीशील समाजसुधारक : पंडिता रमाबाई

**प्रा. रमेश अंबऋशी शितोळे**
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, श्री. वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा. ता. शिरुर, जि. पुणे.

एकोणिसावे शतक हे धार्मिक, सामाजिक सुधारणा चळवळीचे पर्व मानले जाते. या शतकात समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या सुधारकांनी प्रयत्न केले त्यातील काही समाज सुधारक हे उच्चभ्रू कुटुंबातील होते ज्यांनी आदर्श व मानवता या दोन गोष्टी समोर ठेवून सुधारणा घडवून आणल्या तर काही सुधारक हे असेही होते की ज्यांना उच्चभ्रू समाजाकडून अतिशय हीन वागणूक मिळाली. अनेक दुःख येताना अपमान या सर्व गोष्टींना सामोरे जाऊन समाजातील अनिष्ट रूढी आणि प्रथा परंपरा यांच्या बद्दल मनामध्ये चीड निर्माण झाली व त्यांनी समाज सुधारण्याचे उदात्त ध्येय समोर ठेवून कार्य केले. त्यामध्ये उदारमतवादी विचारांच्या पंडिता रमाबाई ह्या होत. सुधारणा चळवळींमध्ये काही सुधारकांचा चिकित्सक अभ्यास केला तर आपणास असे दिसून येईल की त्यांनी व्यासपीठावरून समाज सुधारण्याच्या गप्पा तर मारल्या परंतु समाज सुधारण्याचे विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरवण्यात ते अपयशी ठरलेले आहेत. परंतु पंडिता रमाबाई यांना मात्र कृतिशील समाज सुधारक म्हणणे वावगे ठरणार नाही कारण त्यांनी समाज सुधारण्याचे विचार प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर मांडलेले आपल्याला पाहायला मिळतात.

23 एप्रिल 1858 रोजी रमाबाई यांचा जन्म अनंत शास्त्री डोंगरे व अंबाबाई डोंगरे यांच्या पोटी तेव्हाच्या मैसूर संस्थानातील मंगलोर जवळ माळहिरंजी जवळील गंगामूळ नावाच्या डोंगरावरील वस्तीत झाला. पुरोगामी विचारांचा वारसा रमाबाईंना वडिलांकडून मिळाला. रमाबाईंना आई वडिलांकडून, विशेषतः आईकडून संस्कृत व्याकरण व साहित्याचे शिक्षण मिळाले. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धिमत्तेच्या रमाबाईंना संस्कृत, हिंदी, बंगाली, मराठी, कन्नड, गुजराती इत्यादी भाषा अवगत होत्या. कलकत्त्यात असताना त्यांचा विविध पदव्या बहाल करून सन्मान करण्यात आला. कलकत्त्याच्या सिनेट हॉलमध्ये त्यांना 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल केल्या. तसेच बंगाली स्त्रियांनी त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले. पंडिता नावाने ओळखल्या जाणाऱ्या रमाबाई या एकमेव महिला होत.

### आंतरजातीय विवाह

रमाबाईंनी समाजाने घालून दिलेली बंधने आपल्या प्रत्यक्ष कृतीतून मोडून काढली. तत्कालीन समाजास आंतरजातीय विवाह अमान्य होता. परंतु पुरोगामी विचाराच्या पंडिता रमाबाईंनी बिपीन बिहारीदास मेधावी या शुद्र जातीतील वकिलाशी विवाह करून चुकीच्या रूढीविरुद्ध बंड पुकारले. प्रत्यक्ष कृतीतून समाज सुधारणा करण्याचा नवा आदर्श उभा केला.

### 'आर्य महिला समाज' च्या माध्यमातून कार्य

कलकत्त्यास गेल्यानंतर केशवचंद्र सेन यांच्याशी संबंध आल्याने प्रस्थापित धर्म व्यवस्थेत बदल घडवून आणण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. १८८२ मध्ये पुणे येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी बालविवाह व पुनर्विवाहास बंदी यांसारख्या समाजविघातक रूढी-



Scanned with CamScanner

परंपरा व चालीरीतींच्या जोखडातून समाजास मुक्त करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी "आर्य महिला समाजाची" स्थापना केली. पुणे, अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इत्यादी ठिकाणी "महिला आर्य समाज" या सामाजिक संस्थेची स्थापना करून स्त्री उद्धाराचे कार्य केले.

**धर्मातील मध्यस्थांच्या भूमिकेला विरोध**

प्रस्थापित समाजामध्ये असणाऱ्या विविध चालीरी, मूर्ती पूजा, पुजाऱ्यांचा दांभिकपणा यांस त्यांनी प्रखर विरोध केला. पुजारी देवतांच्या नावाखाली सर्वसामान्य लोकांचे कशाप्रकारे शोषण करतात हे त्यांनी जवळून पहिले होते. म्हणून देवापर्यंत पोहचण्यासाठी लागणारे मध्यस्थ हे त्यांना मान्य नव्हते.

**पुरुषप्रधान व्यवस्थेला विरोध**

भारतीय स्त्रियांच्या शोषणामागे या देशातील पुरुषप्रधान व्यवस्था आहे. याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी आपल्या साहित्यातून या व्यवस्थेवर कठोर ताशेरे ओढले. "द हायकास्ट हिंदू वूमन" या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन संपूर्ण देशातील आणि त्यातही महाराष्ट्रातील भौतिक, वैचारिक तसेच सांस्कृतिक व्यवहार ज्या पुरुषप्रधानतेच्या पायावर उभे होते त्या पुरुषप्रधानतेचे सखोल विश्लेषण त्यांच्या साहित्यात अभ्यासण्यास मिळते.

**धर्मांतर**

इंग्रजी भाषा व वैद्यक या विषयाच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेल्या नंतर रमाबाईनी सेंट मेरी मठात वास्तव्य केले. त्यामुळे त्यांना ख्रिस्ती धर्म व तत्वज्ञान जवळून अभ्यासता व अनुभवता आले. बायबल मधील स्त्रीवादी दृष्टीकोणामुळे व भूतदया आणि प्रेमाच्या शिकवणुकीमुळे त्या ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित झाल्या. परिणामतः २९ सप्टेंबर १८८३ रोजी त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला.

विवेकी दृष्टीकोनातून पंडिता रमाबाई यांनी समाजात सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला. मानवतावादी विचारसरणीतून पिडीत, पतित महिलांची सेवा करण्याचे महान कार्य त्यांनी केले. स्त्रीसुधारनेला विरोध करणाऱ्या तत्कालीन नेते मंडळींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी आपले कार्य अविरतपणे चालू ठेवले. ख्रिस्ती धर्माचा पुरस्कार केल्यानंतर त्यांना सनातनवाद्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. परंतु वडिलांकडून समाज सुधारणेचे बाळकडू घेतलेल्या पंडिता रमाबाई यांनी शेवट पर्यंत स्त्री उद्धाराचे कार्य केले.

**संदर्भ**

१. गद्रे कृष्णाबाई, स्मृती सुमने,मुक्ती मिशन केडगाव,प्रथमावृत्ती: १९३९

२. ठाकरे के.सी., पंडिता रमाबाई सरस्वती.

३. रामटेक रेव्ह. सु.धो. (संपादक र. ना. हर्षे ) अग्रेसर स्त्री कैवारी पंडिता रमाबाई, आर्यभूषण मुद्रणालय, पुणे. आवृत्ती: १९५७

४. मराठी विश्वकोश

५. भागवत, विद्युत, स्त्रीप्रश्नाची वाटचाल, पुणे.

६. कोसंबी मीरा,पंडिता रमाबाई, गंधर्व- वेदप्रकाषण, पुणे. प्रथमावृत्ती २०१०.



Scanned with CamScanner

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GENIUS

ISO 9001:2015 QMS
ISBN / ISSN

ISSN - 2279 - 0489
Volume - XI, Issue – II, February - July - 2023
Impact Factor 2020 - 6.538 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. रमेश अंबऋशी शितोळे

In Recognition of the Publication of the Paper Titled

कृतीशील समाजसुधारक : पंडिता रमाबाई

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta3535@gmail.com,
www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

M - II

Scanned with CamScanner

**ICSSR**

Indian Council of Social Science Research
Western Regional Center, Mumbai
&
Netaji Shaikshan Sanstha's

## SUBHASH BABURAO KUL COLLEGE

(Arts, Commerce & Science) Kedgaon, Tal. Daund, Dist. Pune-412203
&

## PANDITA RAMABAI MUKTI MISSION

Organizes
**Interdisciplinary National Seminar on**

## PANDITA RAMABAI AND WOMEN EMANCIPATION

# CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Miss./Prof./Dr. प्रा. रमेश अंबऋशी शितोळे, साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, श्री. वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा. ता. शिरुर, जि. पुणे. has Participated and Presented a paper tittle ''कृतीशील समाजसुधारक : पंडिता रमाबाई'' in the Two Days Interdisciplinary National Level Seminar held on 3rd & 4th February 2023.

His/her paper has been published in **Peer Reviewed Refereed & UGC Listed Journal No. - 47100 - GENIUS - ISSN - 2279-0489 with Impact Factor - 6.538.**

| Miss.Lorraine Francis | Dr.Rajendra Gaikwad | Dr. Shobha Waikar | Dr.Nandkumar Jadhav |
|---|---|---|---|
| (Director, P.R.M.M.) | (Co-Ordinator) | (Co-Ordinator) | (Principal) |

M - II

Scanned with CamScanner